2020091121230970 17

कोवीड/नॉन कोवीड रुग्णांसाठी HRCT
**चाचणीचे दर निश्चित करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
गो. ते. रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
शासन निर्णय क्र. कोरोना-२०२०/प्र.क्र.३९७/आरोग्य ५
दिनांक : १५ सप्टेंबर, २०२०

**<u>प्रस्तावना</u> :-**

राज्यातील कोवीड-१९ विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, कोवीड/नॉन कोवीड रुग्णांच्या तपासणीसाठी खाजगी रुग्णालयांनी आकारावयाचे दर तसेच खाजगी प्रयोगशाळांनी आरटीपीसीआर, रॅपीड ॲन्टीजेन, रॅपीड ॲन्टीबॉडी टेस्ट इ. तपासण्यांसाठीचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

दिनांक ३०.०४.२०२०, २१.०५.२०२० व दिनांक ३१.०८.२०२० च्या अधिसचूनांमध्ये विविध उपचार/तपासण्यांचे दर पत्रक नमूद आहे. तथापि, या तपासण्यांव्यतिरिक्त रुग्णांसाठी सीटी स्कॅन सारख्या तपसण्यांची आवश्यकता भासत आहे. या तपासणीसाठी खाजगी रुग्णालये किंवा सीटी स्कॅन तपासणी सुविधा उपलब्ध असलेल्या तपसणी केंद्रांकडून अवाजवी रक्कम आकरण्याबाबतच्या तक्रारी रुग्णांकडून/लोक प्रतिनिधींकडून प्राप्त होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव, HRCT चाचण्यांचे दर निश्चित करण्यासाठी समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

१) कोवीडबाधेसह विविध आजारांवर उपचार करण्यासाठी सीटीस्कॅन या चाचणीची आवश्यकता भासत असल्याने, राज्यातील HRCT सुविधा असलेल्या खाजगी रुग्णालये/ तपासणी केंद्रे यांचेकडून HRCT चाचणीचे शुल्क निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | श्री. सुधाकर शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई. | अध्यक्ष |
| २ | डॉ. अनाघा जोशी, विभाग प्रमुख रेडीऑलॉजी) एल. टी. मेडिकल कॉलेज ॲण्ड सायन हॉस्पिटल, सायन, मुंबई. | सदस्य |
| ३ | अधिष्ठाता, सर जे. जे. रुग्णालय, मुंबई. | सदस्य |
| ४ | संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई. | सदस्य सचिव |



Scanned with CamScanner

२) सदर समितीने राज्यातील HRCT चाचणीच्या दर निश्चितीसाठी खाजगी रुग्णालये व HRCT चाचणी केंद्रे यांच्याशी वाटाघाटी करून सात दिवसात कमाल दर निश्चित करून, त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३) जिल्हाधिकारी (सर्व).
४) महानगरपालिका आयुक्त (सर्व).
५) मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई.
९) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई व पुणे.
१०) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
११) डॉ. अनाघा जोशी, विभाग प्रमुख रेडीऑलॉजी) एल. टी. मेडिकल कॉलेज ॲण्ड सायन हॉस्पिटल, सायन, मुंबई.
१२) अधिष्ठाता, सर जे. जे. रुग्णालय, मुंबई.
१३) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व).
१४) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
१५) निवड नस्ती (आरोग्य-५)



Scanned with CamScanner